ISSN 2278-8808
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# दस्तऐवज विश्लेषण पध्दती : अर्थ व स्वरूप

**दिगंबर दुर्गाडे, Ph. D.**

*सहयोगी प्राध्यापक, टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे*

**Abstract**

*ज्या बाबी आपण वाचू शकतो आणि ज्यांचा संबंध समाज जीवनाशी लावता येतो त्यास दस्तऐवज म्हणतात. कोहेनेट यांच्या मते प्रत्यक्ष नोंदी, दैनंदिनी, जर्नल्स, कागदपत्रे, चरित्रे, आत्मचरित्रे, औपचारिक कागदपत्रे, सभेची इतिवृत्ते, ई मेल्स, पुरातत्व विभागाची कागदपत्रे, संसदेतील चर्चा, वर्तमानपत्रे, शोधनिबंध, इंटरनेट, भाषणे इत्यादी दस्तऐवजाचे महत्वाचे प्रकार आहेत. सत्यता, प्रतिनिधीकता, विश्वसनीयता व अर्थपूर्णत: हे या चार निष्कर्षांच्या आधारे दस्तऐवजाचे मूल्यमापन करता येते असे स्कॉट यांचे मत आहे. दस्तऐवज नोंदपत्रिका तयार करताना दस्तऐवजाचे संकलन, वाचन, नोंदपत्रिकेसाठी मुद्द्यांची निर्मिती, नोंदपत्रिका प्रथम मसुदा तयार केला जातो त्यानंतर नोंदपत्रिकेची तज्ज्ञांमार्फत तपासणी करून त्यात आवश्यक ते बदल करून दस्तऐवज नोंदपत्रिका, तयार केली जाते. संशोधनासाठी ही पध्दती अत्यंत उपयुक्त आहे.*

*महत्वाचे मुद्दे : दस्तऐवज, दस्तऐवज नोंदपत्रिका.*

## १) दस्तऐवज विश्लेषण पद्धती

दस्तऐवजांचे पध्दतशीरपणे विश्लेषण व अर्थनिर्वचन दस्तऐवज विश्लेषणामध्ये केले जाते. दस्तऐवज विश्लेषण संशोधनाव्दारे उपलब्ध माहितीचे, दस्तऐवजांचे शोधन करून त्यांचे विश्लेषण व अर्थ निर्वचनाव्दारे संशोधन प्रश्नांची उत्तरे शोधली जातात. ही माहिती गुणात्मक व संख्यात्मक दोन्ही प्रकारची असते.

दस्तऐवज संशोधन पध्दती समजून घेण्यासाठी सर्वप्रथम दस्तऐवज ही संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे.

- **दस्तऐवज**

Things that we can read and which related to some aspect of the social world

McDonald.

ज्या बाबी आपण वाचू शकतो आणि त्याचा संबंध समाज जगताशी लावता येतो त्यास दस्तऐवज असे म्हणतात. दस्तऐवजांचा सामाजिक शास्त्राच्या संशोधनात उपयोग होतो.

दस्तऐवज हे शक्यतो लिखित स्वरूपात असावे. जेणेकरून त्यामधील आशयाचे ज्ञान मिळविणे याव्दारे शक्य होईल. दस्तऐवजांचा संबंध समाजजीवनामधील काही पैलू, वैयक्तिक व समूह वर्तन, एखादी व्यक्ती, समूह, संस्था, समुदाय किंवा सामाजिक निगम आणि सामाजिक प्रक्रिया, सामाजिक जीवन इ. शी असतो.

याबरोबरच दस्तऐवजांमध्ये व्यापक दृष्टीने विचार करता ऑडिओ, व्हीडीओ टेप, छायाचित्र, चित्रे, रेखाचित्रे, कार्टून्स, पोस्टर्स, स्लाईड्स, फिल्म्स, पारदर्शिका, फ्लॉपीज, सी.डी.ज, इंटरनेट व वेबपेजवर उपलब्ध साधनसामुग्री याशिवाय मुलाखती, तोंडी माहिती याव्दारेही दस्तऐवज संशोधनाच्या अभ्यासासाठी आवश्यक त्या माहितीचा पुरवठा होतो.

- **दस्तऐवजाचे प्रकार :**

प्रत्यक्ष नोंदी, दैनंदिनी व जर्नल्स, कागदपत्रे, चरित्रे, आत्मचरित्रे, औपचारिक कागदपत्रे, वेळापत्रके, तांत्रिक कागदपत्रे, सभेची इतिवृत्ते, विद्यार्थ्यांच्या कामाचे नमुने, मेमोज व इ मेल्स, अहवाल व आकडेवारी, पत्रव्यवहार, नियोजन, जाहिराती व पॅम्प्लेट्स, माहितीपुस्तक व डिरेक्टरीज, पुरातत्व विभागाची कागदपत्रे, भाषणे व संवाद, धोरण पुस्तिका, गोष्टी, प्राथमिक व दुयम साधने, वर्तमानपत्रे, लेख, पुस्तके व शोधनिबंध, सार्वजनिक कागदपत्रे (सरकारी निमसरकारी खाजगी), पत्रव्यवहार, खाजगी कागदपत्रे, साहित्य, प्रिंट व व्हिज्युअल मिडीया, संग्रहण, ऐतिहासिक दस्तऐवज, संसदेतील चर्चा, वादविवाद, भाषणे, थोर पुरूषांची चरित्रे, संस्थांचा इतिहास, संस्थांचा, विविध संस्कृतीचे दस्तऐवज, तंत्रज्ञान, वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालिके, आकाशवाणी, दूरदर्शन, व्हिडीओ, चित्रपट, इंटरनेट, वेबसाईट्स., **संग्रहण** (जपणूक केलेली कागदपत्रे). इत्यादी दस्तांचे प्रकार आहेत.

**दस्तऐवजांचे मूल्यमापन –**

दस्तऐवज विश्लेषणामध्ये उपयोगात आणलेले दस्तऐवज हे विविध प्रकारचे व स्वरूपाचे असतात. संशोधकाला त्याच्या अभ्यास विषयाच्या गरजेनुसार आवश्यक ती माहिती गोळा करावी लागते. उपलब्ध असलेले दस्तऐवज विश्वसनीय, वस्तुनिष्ठ व अचूक आहेत की नाही याची खात्री करण्यासाठी त्याची बारकाईने तपासणी व मूल्यमापन करणे आवश्यक आहे, Scott (1990) यांच्या मते वर्तन शास्त्राचा अभ्यासासाठी उपलब्ध दस्तऐवजांचे मूल्यमापनाकरिता चार प्रमुख निष्कर्ष सुचविले आहेत.

**१. सत्यता :**

दस्तऐवजांची अधिकृतता तपासताना दस्तऐवजाची सत्यता, परिपूर्णता, विश्वसनीयता व दस्तऐवजाचा अधिकृत स्त्रोत व सदरच्या दस्तऐवजाची सफलता सिध्द करता आली पाहिजे.

दस्तऐवजांची विश्वसनीयता तपासण्यासाठी दस्तऐवजाचे लेखक, दस्तऐवजाविषयीचे वाङमय चौर्य, प्रकाशनाची आवृत्ती व प्रकाशक इ. विषयीची माहितीची अधिकृतता आवश्यक असते.

**२. विश्वसनीयता :**

दस्तऐवजाची विश्वसनीयता ही संशोधनाच्या निष्कर्षामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावते. संबंधित दस्तऐवजाचे लेखन करताना लेखकाची वस्तुनिष्ठता, त्याचे संदर्भ, लेखनामागची पार्श्वभूमी इ. बाबींची खातरजमा आवश्यक असते. त्यातूनच विश्वसनीयता निश्चित केली जाते.

**३. प्रातिनिधीकता:**

ज्या दस्तऐवजाविषयी अभ्यास करावयाचा आहे त्या दस्तऐवजामधील माहिती अधिकृत व विश्वसनीय असण्याबरोबरच त्या माहितीव्दारे मिळणारे संदर्भ हे परिपूर्ण म्हणजेच प्रातिनिधिक असणे आवश्यक आहे. उपलब्ध माहिती ही उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी पुरेशी असल्यास संबंधित दस्तऐवजातील आशय हा प्रातिनिधिक स्वरूपाचा आहे असे आपण मानतो.

**४. अर्थपूर्णता :**

उपलब्ध दस्तऐवजांचा अभ्यास करताना संशोधकाला त्यामधून तीन प्रकारचे अर्थ मिळतात. शब्दश: अर्थ, सखोल किंवा छुपा अर्थ, व्यावहारिक व परिस्थितीजन्य अर्थ.

दस्तऐवजांचे योग्य विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी संशोधकाला जास्त सावधानता बाळगावी लागते. सर्वसमावशेक, परिपूर्ण व सर्वंकष माहिती मिळविण्यासाठी सदरच्या दस्तऐवजामध्ये दडलेला अर्थ शोधून काढावा लागतो. दस्तऐवजांचा परिपूर्ण, व्यावहारिक, परिस्थितीजन्य, सखोल व व्यापक अर्थ समजून घेण्यासाठी संशोधकाने ज्ञानकोश, शब्दकोश, प्रमाणभूत शब्दकोश, सदर विषयाची परिभाषा याबरोबरच तज्ञांचे मार्गदर्शन व मते जाणून घ्यावीत. जेणेकरून दस्तऐवजाचे योग्य विश्लेषण व अर्थनिर्वचन करता येईल.

**दस्तऐवज विश्लेषण पध्दती अर्थ आणि स्वरूप :**

A type of qualitative research that focuses on the search, anaylisis and interpretation of the available relevant documents for answering the research questions of the study”

दस्तऐवज विश्लेषण संशोधानाव्दारे उपलब्ध असलेल्या संबंधित दस्तऐवजांचे अभ्यासपूर्ण पध्दतीने विश्लेषण व अर्थनिर्वचन करून संशोधन समस्येची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला जातो.

दस्तऐवज (आशय, पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे, अहवाल, पत्रे, न्यायालयीन निर्णय, जाहिराती, फोटो, चित्रे इ.) लेखनामागील हेतू शोधण्यासाठी, त्यातील विचार व माहिती मिळविणे, त्यातील गुण व दोष यांचा शोध घेणे आणि त्यातील वारंवारिता शोधण्यासाठी वापरण्यात येणारी संशोधन पद्धती म्हणजे दस्तऐवज विश्लेषण पद्धती होय.

दस्तऐवज विश्लेषण संशोधन पध्दतीमध्ये संशोधकाला त्याच्या संशोधन प्रश्नाच्या अभ्यासासाठी उपलब्ध दस्तऐवजांचे विश्लेषण करून आवश्यक ती माहिती व पुरावे गोळा करावे लागतात. संशोधनाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी संशोधकाला संबंधित उपलब्ध दस्तऐवजांचे योग्य विश्लेषणाव्दारे समस्येच्या उत्तरापर्यंत पोहोचता येते.

Activity in which evidence is extracted from sources such as population censuses, school records, vital statistics, cemetery records, diaries, autobiographies, personal letters, economic records, books magazines, speeches, court records, congessional records, laws and

regulations, and a host of other material or sources stored away by various sectors of societies and individuals.

Adams and Schvanevedt

दस्तऐवज विश्लेषण संशोधन पध्दती हा संशोधनाचा असा प्रकार आहे की ज्यामध्ये अभ्यासाविषयाच्या संशोधन प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी संशोधक उपलब्ध संबंधित दस्तऐवजांचे शोधन, विश्लेषण व अर्थनिर्वचनावर भर दिला जातो.

दस्तऐवज विश्लेषण संशोधन पध्दतीची वैशिष्टे :

१. माहितीचा स्त्रोत हा उपलब्ध दस्तऐवजावर अवलंबून असतो.
२. दस्तऐवज किंवा माहितीचे स्त्रोत हे संशोधकाने तयार केलेले नसतात तर ते अगोदरच उपलब्ध असतात. संशोधकाने त्यामधून संशोधन विषयाच्या मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती बाहेर काढायची असते.
३. दस्तऐवज स्वत: संशोधन प्रश्नांची उत्तरे देवू शकत नाही तर संशोधन हेतू साध्य करण्यासाठी संशोधकाने दस्तऐवजाचा योग्य उपयोग करून घ्यावा लागतो. अभ्यासविषयाच्या संबंधित गुणात्मक व संख्यात्मक अर्थपूर्ण माहिती मिळविण्यासाठी संशोधकाला उपलब्ध दस्तऐवजांचा काळजीपूर्वक अभ्यास व अचूक शास्त्रीय विश्लेषण करावे लागते.
४. संशोधकाकडे उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीचे अचूक व काळजीपूर्वक विश्लेषण संशोधकाकडे असणाऱ्या कला व कौशल्यावर अवलंबून आहे. अभ्यासविषयाचे यश, अपयश आणि विश्लेषणाची फलनिष्पती ही संशोधकाच्या अभ्यासपूर्ण अर्थनिर्वचनावर अवलंबून असते.

दस्तऐवज संशोधन विश्लेषण म्हणजे अशा प्रकारचे संशोधन की जे संशोधकाला अभ्यासविषयाशी संबंधित उपलब्ध दस्तऐवजांचे शोधन, विश्लेषण व अर्थनिर्वचनाव्दारे संशोधन प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आवश्यक ती माहिती (गुणात्मक व संख्यात्मक) मिळविण्यासाठी मदत करते.

**३.५.१ दस्तऐवज नोंद पत्रिका :**

ऐतिहासिक संशोधन करीत असताना किंवा वर्तमान कालीन संशोधन करीत असताना दस्तऐवजांवर आधारित संशोधन असेल तर त्यामध्ये प्राथमिक आणि दुयम दस्तऐवजांचा अभ्यास करावा लागतो. उपलब्ध असणाऱ्या विविध दस्तऐवजांचा आपल्या अभ्यासाची उद्‌दिष्टे, गरज व महत्व या अनुषंगाने विश्लेषणात्मक व सखोल अभ्यास करावा लागतो. हा अभ्यास करत असताना, आपल्या अभ्यास विषयाला आवश्यक असणाऱ्या महत्वाच्या मुद्‌दयांची योग्य ती नोंद ठेवावी लागते. या नोंदीच्या आधारे आपले संशोधन कार्य उद्‌दिष्टानुरूप पूर्ण करता येते. त्या त्या वेळेस वाचन व अभ्यास करत असताना महत्वाच्या मुद्‌दयांच्या नोंदी दस्तऐवज नोंदपत्रिकेमध्ये केल्या जातात. दस्तऐवज नोंदपत्रिका तयार करण्याची पध्दती व पायऱ्या पुढीलप्रमाणे:

**१) दस्तऐवजाचे संकलन –**

दस्तऐवज नोंदपत्रिका तयार करताना सर्वप्रथम संशोधनाच्या उद्दिष्टानुसार आवश्यक दस्तऐवज संकलित करावे लागतात.

**२) दस्तऐवजाचे वाचन –**

संकलित केलेल्या दस्तऐवजांचे सखोल वाचन करणे ही दस्तऐवज नोंद पत्रिका तयार करण्याची दुसरी पायरी आहे. यामध्ये संशोधनाच्या उद्दिष्टानुसार कोणती माहिती आवश्यक आहे. त्या अनुषंगाने दस्तऐवजाचे वाचन केले जाते. सदर वाचन करत असताना, उद्दिष्टे नजरेसमोर ठेवली जातात.

**३) नोंदपत्रिकेसाठी मुद्दयांची निर्मिती :**

दस्तऐवजाचे वाचन झाल्यानंतर या दस्तऐवजातून संशोधकाला जी माहिती आवश्यक आहे त्या माहितीबाबत मुद्दयांची निर्मिती केली जाते. हे मुद्दे नोंद पत्रिकेमध्ये नमूद केले जातात ज्याव्दारे आपल्याला दस्तऐवजातील आवश्यक माहिती घेता येते.

**४) दस्तऐवज नोंदपत्रिकेचा प्रथम मसुदा :**

दस्तऐवज नोंदपत्रिकेचे महत्वाचे मुद्दे तयार केल्यानंतर सदर दस्तऐवज नोंदपत्रिकेचा प्रथम मसुदा तयार केला जातो. या प्रथम मसुदयामध्ये दस्तऐवज नोंदपत्रिकेचे शीर्षक, दस्तऐवज, दस्तऐवजातून घ्यावयाच्या माहितीबाबत महत्वाचे मुद्दे व उपमुद्दे इत्यादींचा समावेश केला जातो.

**५) दस्तऐवज नोंदपत्रिकेची तज्ञांमार्फत तपासणी व त्यानुसार आवश्यक ते बदल.**

संशोधकांनी नोंदपत्रिकेचा प्रथम मसूदा तयार केल्यानंतर त्यातील आवश्यक ते बदल करण्याच्या हेतूने व मसुदयाला अंतिम रूप देण्यासाठी सदर मसूदा तज्ज्ञांना दिला जातो. तज्ज्ञांनी दिलेल्या सुचनानुसार या नोंदपत्रिकेमध्ये आवश्यक ते बदल केले जातात.

**६) दस्तऐवज नोंदपत्रिकेचा अंतिम मसुदा** : दस्तऐवज नोंदपत्रिका निर्मितीचा हा शेवटचा टप्पा असून, तज्ज्ञांच्या मदतीने प्रथम मसुदयात सुचविण्यात आलेले बदल विचारात घेवून नोंदपत्रिकेचा अंतिम मसुदा तयार केला जातो.

**संदर्भसूची**

*ओझरकर, सु. रा. (२०११), राजस्व, नागपूर, विदया प्रकाशन.*

*भिंताडे, वि. रा., (२००९), शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे, नित्य नूतन प्रकाशन.*

*कायंदे–पाटील, गंगाधर (२००८), संशोधन पध्दती, नाशिक, चैतन्य प्रकाशन.*

*चव्हाण, दि. आणि मुळे, सं. (२०१३), शैक्षणिक संशोधन आराखडा, नाशिक, इनसाईट प्ब्लिकेशन्स.*

*पाटील, वा. भा, (२०१२), संशोधन पध्दती, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स.*

*नरवणे, मीनल (२०१६), संशोधन पध्दती : शैक्षणिक व सामाजिक, पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.*

*कुंडले, म. बा. (२००३), शैक्षणिक तत्वज्ञान आणि शैक्षणिक समाजशास्त्र (१० वी आवृत्ती), पुणे : श्री विद्या प्रकाशन.*

*पंडित, बन्सी बिहारी, (२००८), शिक्षणातील संशोधन, पुणे, नित्य नूतन प्रकाशन.*